| | |
|---|---|
| | <u>रे.क.नं. ४८/२०१४ नि. ७३ खालील आदेश.</u><br>श्री.भिमराव बाजीराव करवते<br>विरुध्द<br>शेवंताा रामचंद्र कांबळे ,म.वा.नकुशी वांद्रे वगैरे.५ |

यातील वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ प्रमाणे दावेमध्ये अतिरिक्त विनंती नमुद करणेकरिता केलेला आहे. वादीने दावा कलम १० व दावा विनंती कलम १९ मध्ये दुरुस्ती करणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीने दिनांक १२.११.२०१२ रोजीच्या संचकार पत्राप्रमाणे खरेदीपत्र पुर्ण करुन देणेकरिता व मनाई हुकुमाकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुतची दुरुस्ती वादी दाव्यामध्ये संचकारपत्र रक्कम व्याजासहीत परत मिळावी अशी पर्यायी विनंती नमुद करणेसाठी करत आहे. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, जर काही तांत्रीक व कायदेशिर बाबीमुळे खरेदीपत्र वादीच्या हक्कात करुन देणे शक्य नसेल तर वादीने प्रतिवादीला संचकारपत्रावेळी दिलेली रक्कम व्याजासहित परत मिळावी. त्या अनुशंगाने दावा दुरुस्ती वादीने मागीतलेली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जास निशाणी ७४ ला त्यांचे म्हणणे दिले. प्रतिवादींनी असा आक्षेप घेतला की, वादी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांचे दाव्यातील त्रुट दुरुस्ती करु इच्छीतात, प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. सदरचा अर्ज वादीने खुप विलंबाने दाखल केलेला आहे. वादी दाव्यामध्ये नवीन विनंती करु पाहतात. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचेतर्फे युक्तीवाद ऐकला. दोन्ही विधीज्ञांनी त्यांच्या अर्ज व म्हणण्याला साजेसा युक्तीवाद केला. वादीच्या वकिलांनी त्यांच्या कथनाच्या पृष्टर्थ खालील मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.

१. २००४ (२) एमएचएलजे ७१७. २. २००५ (३) एमएचएलजे ७४७.

३. २००७ (१) एमएचएलजे ३३१. ४. एआयआर १९८१ म.प्र.-३३१.

वरील न्यायनिर्णयांचे बारकाईने अवलोकन केले.मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाने मुखत्वे करुन असा निर्वाळा दिला आहे की, दावा दुरुस्ती दाव्याचे कोणत्याही टप्यावर अगदी दावा अंतिम निर्णयाकरिता आला असला तरी करता येते.

५. अर्ज, म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा खरेदीदस्त करुन देणे व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. वादी दाव्यामध्ये प्रस्तुत दुरुस्तीद्वारे नव्याने व पर्यायी विनंती संचकारपत्र रक्कम व्याजासहित परत मिळावी अशा मागणीकरिता करत आहे. तसेच त्या अनुशंगाने त्याच्या कथनांमध्ये दुरुस्ती मागत आहे. प्रस्तुतच्या दाव्यात प्रतिवादीने कैफियत दाखल केली आहे. परंतू उभयपक्षकारातर्फे पुरावा देण्यात आलेला नाही. सबब प्रकरणात संपरिक्षा चालू झाली असे म्हणता येणार नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती करणेबाबत दोन परिस्थितींचा विचार करणेत आलेला आहे. जर दावा दुरुस्ती संपरिक्षापुर्व असेल तर न्यायालयाने असा अर्ज मान्य करावा असे नमुद आहे. जर दावा दुरुस्ती संपरिक्षा चालू झालेनंतर प्रस्तावित असेल तर न्यायालय अशी दुरुस्ती मंजूर करु शकते परंतू दुरुस्ती मागणा-या पक्षकाराला यापुर्वी दुरुस्ती का मागीतली नाही याबाबत योग्य ते कारण न्यायालयास दाखवावे लागते. वर नमुद केलेप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा चालू झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती नाकारणे म्हणजे अत्यंत तांत्रीक व पांडीत्यपुर्ण (Pedantic) दृष्टीकोन ठेवल्यासारखे होईल.

६. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीचा मुळ आक्षेप हा आहे की, नव्याने संचकारपत्र रक्कम परत मागणीबाबत वादीची दावा दुरुस्ती दाव्याचे मुळ स्वरुप बदलणारी आहे. वादीचा असा युक्तीवाद आहे की,संचकारपत्र रक्कम मिळण्याची पर्यायी मागणी प्रस्तुत दाव्याच्या अनुशंगाने संयुक्तीक आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. दाव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, दावा खरेदीपत्र पुर्ण करणेकरिता आहे, त्यामुळे जर सदरील विनंती मंजूर करणे योग्य नसेल तर वादीला संचकारपत्र रक्कम व्याजासहीत मागण्याचा हक्क आहे. तशी मागणी वादीने दाव्यात नमुद करणे महत्वाचे आहे. तशी मागणी वादीने दाव्यात केल्यास तरच त्याला देता येते. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती न्यायोचीत व संयुक्तीक आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच याठिकाणी प्रतिवादीला झालेल्या तसदीबद्दल वादीस दंड करणे देखील संयुक्तीक आहे. सबब अर्ज काही अंशी दंडावर मंजूर करणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

०१. वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

०२. वादी यांनी प्रतिवादी यांना दंडाची रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे फक्त ) द्यावी.

०३. वादीने अर्जात मागणी केलेप्रमाणे दाव्यामध्ये ज्यादाची दुरुस्ती आजपासून चौदा दिवसाच्या आत करावी व दावा दुरुस्त प्रत त्वरीत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ATUL ASHOK KORE
Date: 2022.09.16 17:43:35 +0530

दिनांक १६.०९.२०२२.

अतुल अ.कोरे,
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा.